।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ८ मार्च २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १० वा


# सात बारा उताऱ्यावर नांव लावण्यासाठी घेतली लाच

## संगेवाडीच्या मंडल अधिकारी श्रीमती विजया महारुद्र नाईक यांचेवर गुन्हा दाखल



सांगोला : आईचे नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या खरेदी दस्तावर प्राप्त हरकतीचे निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावून तक्रारदार यांच्या आईचे नावे केलेल्या खरेदीची नोंद ग्राह धरून त्यांचे नाव सातबारा उता-यावर लावण्यासाठी संगेवाडी मंडल अधिकारी श्रीमती विजया महारूद्र नाईक यांनी सात हजार रुपयांची लाच घेतल्या प्रकरणी मंडल अधिकारी व त्यांचा खाजगी ड्रायव्हर वैभव मोरे रा मुंढेवाडी ता पंढरपूर यांचेविरुद्ध लाच लुचपत विभागाने गुन्हा दाखल केलेला आहे.


याबाबत सविस्तर माहिती अशी की सांगोला तालुक्यातील तक्रारदाराच्या आईचे नांवे केलेल्या खरेदीची नोंद ग्राहय धरून त्यांचे नांव सात बारा उताऱ्यावर लावण्यासाठी मंडल अधिकारी श्रीमती विजया महारूद्र नाईक यांच्यावतीने १०,०००/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७०००/- रू. मागणी केली. श्री वैभव पिराजी मोरे यांनी मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांच्यावतीने केलेल्या लाच मागणीबाबत तक्रारदार सातपुते यांना मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांच्याकडे पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी त्यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांच्या मार्फतीने केलेल्या लाच मागणीस दुजोरा देऊन असुद्या मी बोललेय त्यांच्यापाशी, मी काय डायरेक्ट बोलत नाय, मी सांगितलय त्यांच्यापाशी, सांगतो पुन्हा आम्ही अजून तुम्हाला असे म्हणून सदर अपराधास अपप्रेरणा दिली.

त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे खाजगी वाहनाचे चालक श्री वैभव मोरे यांनी तक्रारदार सातपुते यांच्याकडून ७०००/- रू लाचेची रक्कम स्वतः स्वीकारले. म्हणून श्रीमती विजया महारूद्र नाईक, वय ४५ वर्षे, पद मंडल अधिकारी, नेम सांगोला तहसिल कार्यालय व त्यांचे खाजगी वाहनाचे बालक श्री वैभव पिराजी मोरे, वय २८ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा. मु.पो मुंढेवाडी, ता. पंढरपुर, जि. सोलापूर यांनी लोकसेवा प्रदान करण्यासाठी आरोपी क्र. ०१ यांचे करीता अयोग्यरित्या बेकायदेशीर पारितोषण स्विकारुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून त्यांचेविरूध्द फिर्याद सांगोला पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास सोलापूर अँटी करप्शनचे पोलीस निरीक्षक शैलेश पवार करीत आहेत.

# वाळु माफियांचे धाडस वाढले

## अवैध वाळू वाहतूक कारवाई दरम्यान भरारी पथकावर हल्ला; दोन जणांवर गुन्हा दाखल करून अटक



सांगोला : अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसील कार्यालयाच्या भरारी पथकावर हल्ला करून सरकारी कामात अडथळा आणल्याची घटना ४ मार्च रोजी पहाटे कडलास येथे घडली या प्रकरणी
दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून चालकाचाही शोध सुरू आहे.घटनेची फिर्याद महेश जाधव, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय सांगोला यांनी सांगोला पोलीस स्टेशनला दिली आहे.

दरम्यान भ्याड हल्ला केलेल्या आरोपींवर तातडीने गुन्हा दाखल होईपर्यंत सकाळी बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कडलास-जवळा रोडवरील म्हसोबा मंदिराजवळ एक पांढऱ्या रंगाचा विना क्रमांकाचा सहा टायर टिपर कोरड्या नदीपात्रातून ३ ब्रास वाळू चोरी करून नेताना आढळून आला.

पथकाने कारवाई करताच चालक अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पसार झाला. सदर टिपर ताब्यात घेऊन पथक परत येत असताना कडलास येथे दोघांनी विना क्रमांकाच्या वाहनाने सरकारी वाहन आडवे लावून अडविले. तसेच अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न करून शिवीगाळ व दमदाटी करत दगडफेक करून सरकारी वाहन व खाजगी वाहन यांच्या समोरील काचा फोडून सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान केले. या हल्ल्यात महसूल सेवक सुनिल गोडसे (रा. मेडशिंगी) यांना दगड लागून डाव्या हाताच्या अंगठ्याचे नख तुटून जखम झाली. तसेच फिर्यादी जाधव यांनाही मारहाण करण्यात आल्याचे सांगितले आहे.

पोलीसांनी अंदाजे ५ लाख रुपये किमतीचा विना क्रमांकाचा सहा टायर टिपर व सुमारे १४,२५० रुपये किमतीची ३ ब्रास वाळू असा एकूण ५,१४,२५० रुपयांचा माल जप्त केला आहे.

# गटनेते नगरसेवक रमेश जाधव यांची
# महात्मा जोतीबा फुले यांच्या नावे भव्य उद्यानाची मागणी



सांगोला : सांगोला शहरातील महात्मा फुले चौक येथील सर्व्हे नंबर २४७ आरक्षण क्रमांक ३४ विकसित करून त्याठिकाणी 'महात्मा जोतीबा फुले उद्यान' नावाने भव्य उद्यान विकसित करण्याची मागणी नगरसेवक व गटनेते रमेश पांडुरंग जाधव यांनी सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंद माने यांच्याकडे केली आहे.

गटनेते रमेश जाधव यांनी सांगोला शहरातील महात्मा फुले चौक येथील आरक्षण क्र. ३४ हे 'महात्मा जोतीबा फुले उद्यान' म्हणून नामकरण करावे. या उद्यानात महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य शिल्प उभारण्यात यावे. तसेच महात्मा जोतीबा फुले यांनी रायगडावरील समाधी शोधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस्थळी सार्वजनिक शिवजयंतीची सुरुवात केली असल्याने तसेच हा इतिहास नविन पिढीला माहिती होण्यासाठी या उद्यानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंग आधोरेखित करणारी भव्य शिवसृष्टी उभारण्यात यावी अशी मागणी केली आहे.

ही मागणी मान्य झाल्यास सांगोला शहराला महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीला साजेसे एक भव्य हिरवेगार उद्यान मिळेल. यामुळे शहराच्या सांस्कृतिक व पर्यावरणीय विकासाला चालना मिळेल.

सांगोला नगरपरिषदेने आता या प्रस्तावावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकां मधून व्यक्त केली जात आहे.

## सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रम उत्साहात संपन्न; २०० महिलांची रक्त तपासणी

सांगोला : जागतिक महिला दिनानिमित्त प्रभाग क्र. ४ च्या नूतन नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून महिलांच्या आरोग्य जनजागृती व सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे तसेच त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने प्रोत्साहन देणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे उपक्रम राबविण्यात आले. हे सर्व उपक्रम उत्साहात व मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले. सांगोला येथील सनगर गल्लीतील समाज मंदिर येथे आयोजित मोफत रक्त तपासणी शिबिरामध्ये परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिबिरात सीबीसी (हेमोग्राम), टी३, टी४, टीएसएच (थायरॉईड) तसेच एचबीए१सी (साखर) या महत्त्वाच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबिरामध्ये एकूण २०० महिलांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान महिलांना आरोग्याविषयी आवश्यक मार्गदर्शनही करण्यात आले. यासोबतच वज्राबाद पेठ परिसरात महिलांसाठी मोफत प्रशिक्षण उपक्रमही आयोजित करण्यात आला. महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षणामध्ये बेसिक टेलरिंग, ॲडव्हान्स टेलरिंग, मेकअप, मेहेंदी डिझाईन यासारख्या कौशल्यांचे मार्गदर्शन देण्यात आले.

# मुक्त विचार

## विचारधन



भीती ही सर्वात मोठी कमकुवतपणा आहे. भीतीवर विजय मिळवणे म्हणजेच विजयाची पहिली पायरी.

- इंदिरा गांधी

## जागतिक महिला दिन : सन्मानाचा उत्सव की संघर्षाची जाणीव?

जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पण हा केवळ शुभेच्छांचा, गुलाबांच्या फुलांचा आणि सोशल मीडियावरच्या पोस्टांचा दिवस आहे का? की हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा. समाज म्हणून आपण स्त्रीच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेसाठी नेमकं काय केलं याचा हिशेब मांडण्याचा? जागतिक महिला दिनाची संकल्पना ही फक्त उत्सवासाठी जन्माला आलेली नाही. १९०८ साली न्यूयॉर्क येथे कामगार महिलांनी समान वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मतदानाचा अधिकार यासाठी आंदोलन छेडले. त्या आंदोलनातून उगम पावलेला हा दिवस पुढे युनायटेड नॅशन्सने १९७५ मध्ये याला अधिकृत मान्यता दिली आणि जगभर स्त्री-अधिकारांच्या लढ्याचे प्रतीक म्हणून तो साजरा होऊ लागला. म्हणजेच, हा दिवस आहे संघर्षाचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा.

भारतात स्त्री शिक्षणाची टक्केवारी वाढली आहे, अनेक महिला प्रशासन, उद्योग, विज्ञान, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत झेंडा रोवत आहेत. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान आहेत; वित्त, संरक्षण, अवकाश संशोधन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत महिलांनी नेतृत्व सिद्ध केले आहे. पण दुसरीकडे, घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी छळ, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या या सारख्या समस्या अजूनही विदारक वास्तव म्हणून समोर आहेत. शिक्षण घेतलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलेलाही सुरक्षिततेची हमी नाही, ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे. महिलांच्या सन्मानासाठी कायदे झाले, २०१३ चा 'कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा', बालविवाह प्रतिबंध, घरेलू हिंसाचार प्रतिबंध पण कायदे कागदावर असले तरी त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे? समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री सन्मानाचे स्वप्न पूर्ण होणार नाही. स्त्री-पुरुष समान आहेत ही घोषणा आपण सहज करतो पण घरातील कामांची विभागणी पाहिली, तर अजूनही स्वयंपाकघराची जबाबदारी स्त्रीचीच मानली जाते. नोकरी करणारी स्त्री असो वा गृहिणी तिचा दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्टांनी भरलेला असतो. तिच्या श्रमाला 'कर्तव्य' म्हणत आपण त्याची किंमत मोजतच नाही. ग्रामीण भागात तर अजूनही अनेक मुली शिक्षणाऐवजी घरकाम किंवा लवकर लग्नाच्या चक्रात अडकतात. शहरात करिअर करणाऱ्या महिलेला 'घर सांभाळशील का?' हा प्रश्न विचारला जातो; पण पुरुषाला 'घर सांभाळशील का?' असा प्रश्न विचारला जात नाही. हीच मानसिक दरी आहे.

स्त्री म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही तर आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांतूनच स्त्रीची ओळख ठरवण्याची सवय आपण लावून घेतली आहे. पण ती केवळ कोणाची तरी 'आई' किंवा 'पत्नी' नाही; ती स्वतःच्या स्वप्नांची, ध्येयांची, क्षमतेची स्वतंत्र व्यक्ती आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करताना समाजाच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर दगड-चिखल फेकला गेला, अपमान झाला; पण त्यांनी हार मानली नाही. आज शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची वाढती संख्या ही त्याच संघर्षाची फलश्रुती आहे. स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणून आपण देवींची पूजा करतो, पण घरातील स्त्रीला निर्णयप्रक्रियेत समान स्थान देतो का? पूजा आणि प्रत्यक्ष वागणूक यातला विरोधाभास आजही जिवंत आहे.

स्त्री रात्री उशिरा सुरक्षितपणे रस्त्यावर चालू शकेल का? हा प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे. मुलींना लहानपणापासून सावध रहा, असे करू नकोस, तिथे जाऊ नकोस असे शिकवले जाते; पण मुलांना आदर कर, जबाबदारीने वाग हे कितपत शिकवले जाते? महिला सुरक्षेचे प्रश्न केवळ पोलिस-प्रशासनापुरते मर्यादित नाहीत; ते सामाजिक संस्कारांशी जोडलेले आहेत. घरापासून शाळेपर्यंत आणि माध्यमांपासून मनोरंजनापर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा शक्तिशाली मंच आहे. महिलांना स्वतःचा आवाज मांडण्याची संधी मिळाली आहे; पण त्याचबरोबर ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर छळ, अपमानास्पद टिप्पणी यांचाही सामना करावा लागतो. एका बाजूला महिला पायलट, शास्त्रज्ञ, खेळाडू म्हणून देशाचा अभिमान वाढवत आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कपड्यांवर, व्यक्तिमत्त्वावर टीका केली जाते. स्त्रीची कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्य रूपावर अधिक चर्चा होते, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

महिला दिनी भाषणे, सन्मान सोहळे, पुरस्कार हे सर्व महत्त्वाचे आहेत पण तेवढ्याने परिवर्तन घडणार नाही. बदलाची सुरुवात घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, समान संस्कार, समान अपेक्षा दिल्या पाहिजेत. शाळांमध्ये लिंग-संवेदनशील शिक्षण आवश्यक आहे. माध्यमांनी जबाबदारीने स्त्रीप्रतिमा मांडली पाहिजे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज अधिक प्रभावी झाला पाहिजे. स्त्री रोज लढते कधी घरात, कधी कामावर, कधी समाजात आणि कधी स्वतःच्या मनात. तिच्या डोळ्यात स्वप्ने असतात पण त्यांना पूर्ण करण्यासाठी तिला अनेक अडथळ्यांवर मात करावी लागते. जागतिक महिला दिन हा तिच्या संघर्षाला सलाम करण्याचा दिवस आहे. तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि सहनशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा दिवस आहे तिच्या वेदना समजून घेण्याचा, तिच्या आवाजाला ऐकण्याचा आणि तिच्या सोबत उभे राहण्याचा.

८ मार्च हा फक्त कॅलेंडरवरील एक दिवस नाही; तो समाजाच्या प्रगतीचा आरसा आहे. आपण खरोखरच स्त्रीला समानतेचे स्थान दिले आहे का? की अजूनही ती अनेक बंधनांत अडकलेली आहे? महिला दिनाच्या शुभेच्छा देताना आपण एक वचन देऊ या स्त्रीला केवळ सन्मानाचे शब्द नव्हे, तर समानतेची संधी देऊ, तिच्या स्वप्नांना आकाश देऊ आणि तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ. स्त्री सशक्त झाली, तर समाज सशक्त होईल. कारण स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही तर ती राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीला मनापासून सलाम तिच्या अस्तित्वाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेला. हा दिवस उत्सवाचा असो पण त्याहून अधिक परिवर्तनाचा असो. स्त्री ही शक्ती आहे, संवेदना आहे, संघर्ष आहे आणि सृजन आहे. तिच्याशिवाय समाज अपूर्ण आहे; तिच्या सन्मानाशिवाय प्रगती अपूर्ण आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना आर्थिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतः कमावणारी स्त्री निर्णय घेण्यास अधिक सक्षम होते. स्वयं-सहाय्यता गट, स्टार्टअप्स, लघुउद्योग यांमुळे अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवले आहे. परंतु वेतनातील असमानता अजूनही दिसते. समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना अजून पूर्णत्वाला गेलेली नाही. ग्रामीण शेतमजुरीपासून ते कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत महिलांना अनेकदा कमी मोबदला दिला जातो. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ पैसा नव्हे; तो आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सन्मान यांचा पाया आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवं आकाश लाभो, स्वप्नांना नवी दिशा मिळो आणि आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर सन्मान, सुरक्षितता आणि समानतेची साथ लाभो, हीच सदिच्छा. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना मनःपूर्वक शुभेच्छा!

-प्रविण बागडे,नागपूर

## सेमिफायनलमध्ये इंग्लंडला अक्षरशः पाणी पाजले आता फायनलमध्ये न्यूझीलंडची पाळी!

क्रिकेट हा भारतात केवळ एक खेळ नाही; तो भावना आहे, तो उत्साह आहे, तो करोडो भारतीयांच्या हृदयाचा ठोका आहे. मैदानावर अकरा खेळाडू उतरतात, पण त्यांच्या मागे उभा असतो संपूर्ण देश. प्रत्येक चौकारावर आनंदाचा जल्लोष होतो आणि प्रत्येक विकेटवर लाखो हृदये धडधडू लागतात. अशा या क्रिकेटच्या महायुद्धात सेमिफायनलमध्ये भारताने इंग्लंडला दिलेला दणदणीत पराभव हा केवळ एक सामना जिंकण्याचा क्षण नव्हता, तर तो भारतीय क्रिकेटच्या आत्मविश्वासाचा, जिद्दीचा आणि सामर्थ्याचा भव्य आविष्कार होता. सेमिफायनलमध्ये भारतीय संघाने इंग्लंडवर मिळवलेला दणदणीत विजय हा फक्त स्कोअरबोर्डवरील आकड्यांचा विजय नव्हता; तो मानसिक ताकदीचा, रणनीतीचा आणि संघभावनेचा विजय होता. इंग्लंडसारख्या बलाढ्य संघाला पराभूत करणे म्हणजे सहज गोष्ट नाही. पण भारतीय खेळाडूंनी दाखवून दिले की, जेव्हा आत्मविश्वास आणि मेहनत एकत्र येतात, तेव्हा कोणतीही अडचण मोठी राहत नाही.

सेमिफायनलच्या सामन्यात भारतीय संघाने दाखवलेली खेळाची गुणवत्ता आणि शिस्त पाहिली, तर एक गोष्ट स्पष्ट होते हा संघ फक्त खेळत नाही, तर प्रत्येक क्षणी जिंकण्याची मानसिकता घेऊन मैदानात उतरतो. फलंदाजांनी संयम आणि आक्रमकतेचा सुंदर समतोल राखला, तर गोलंदाजांनी इंग्लंडच्या फलंदाजांना अक्षरशः गुडघे टेकायला भाग पाडले. क्षेत्ररक्षणातही भारतीय खेळाडूंनी चपळता आणि जागरूकतेचे अप्रतिम दर्शन घडवले. क्रिकेटमध्ये अनेकदा असे म्हटले जाते की मोठे सामने केवळ कौशल्याने जिंकले जात नाहीत; ते जिंकले जातात धैर्याने आणि मानसिक बळावर. सेमिफायनलमध्ये भारतीय संघाने हेच सिद्ध केले. दबावाच्या क्षणीही खेळाडूंनी संयम राखला आणि प्रत्येक चेंडूवर लढण्याची वृत्ती दाखवली. हीच वृत्ती भारतीय क्रिकेटची खरी ताकद आहे.

या विजयाने संपूर्ण देशात उत्साहाची लाट उसळली आहे. गावोगाव, शहरोगावी, चौकात आणि घराघरात एकच चर्चा सुरू आहे. भारत फायनल जिंकणार का? लोकांच्या डोळ्यांत आशा आहे, मनात विश्वास आहे आणि ओठांवर एकच घोषणा आहे भारत जिंकणार! आता पुढे आहे अंतिम सामना आणि समोर आहे न्यूझीलंडचा संघ एक शांत, संयमी पण अत्यंत धोकादायक संघ. न्यूझीलंड संघ नेहमीच आपल्या शिस्तबद्ध खेळासाठी ओळखला जातो. ते फार गाजावाजा करत नाहीत पण मैदानावर त्यांच्या खेळातून त्यांची ताकद दिसून येते. म्हणूनच फायनलचा सामना सोपा नसेल, हे निश्चित आहे.

क्रिकेटच्या इतिहासात न्यूझीलंडने अनेक वेळा मोठ्या संघांना धक्का दिला आहे. त्यांच्या गोलंदाजीची अचूकता, फलंदाजीतील संयम आणि क्षेत्ररक्षणातील चपळता यामुळे ते कोणत्याही संघासाठी आव्हान ठरतात. त्यामुळे भारतीय संघाने सेमिफायनलचा विजय विसरून पुन्हा नव्या उमेदीने मैदानात उतरायला हवे. फायनल हा केवळ खेळ नसतो; तो मानसिक संघर्ष असतो. प्रत्येक चेंडू, प्रत्येक धाव आणि प्रत्येक निर्णय सामन्याचा प्रवाह बदलू शकतो. अशा वेळी अनुभव, संयम आणि संघभावना अत्यंत महत्त्वाची ठरते. भारतीय संघाकडे ही तीनही शस्त्रे आहेत. भारतीय क्रिकेटची एक मोठी ताकद म्हणजे त्याची विविधता. संघात अनुभवी खेळाडू आहेत, तर युवा खेळाडूंची ऊर्मीही आहे. अनुभवी खेळाडू संकटाच्या क्षणी स्थिरता देतात, तर तरुण खेळाडू आक्रमकता आणि ऊर्जा आणतात. या दोन्हींच्या संगमामुळे भारतीय संघ अधिक सक्षम बनतो.

भारतीय क्रिकेटचा इतिहास पाहिला, तर अनेक संस्मरणीय क्षणांनी तो उजळलेला आहे. प्रत्येक पिढीने काही ना काही मोठे यश मिळवले आहे. आजची पिढीही त्या परंपरेला पुढे नेत आहे. सेमिफायनलमध्ये इंग्लंडवर मिळवलेला विजय हा त्या प्रवासातील आणखी एक अभिमानाचा टप्पा आहे. परंतु खरा कस आता लागणार आहे. कारण फायनल हा अंतिम कसोटीचा क्षण असतो. येथे केवळ कौशल्य नव्हे, तर मानसिक ताकदही तितकीच महत्त्वाची असते. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवला आणि शांतपणे खेळ केला, तर विजय दूर नाही. या संपूर्ण स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी जे प्रदर्शन केले आहे, त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते हा संघ केवळ विजयासाठी खेळत नाही, तर देशाच्या स्वाभिमानासाठी खेळतो. प्रत्येक खेळाडूच्या डोळ्यांत देशासाठी काहीतरी मोठे करण्याची जिद्द दिसते.

भारतीय प्रेक्षकांचे प्रेम आणि पाठिंबा हीदेखील संघाची मोठी ताकद आहे. मैदानावर असो किंवा दूरचित्रवाणीसमोर, करोडो भारतीय आपल्या संघासाठी प्रार्थना करत असतात. हा भावनिक आधार खेळाडूंना अतिरिक्त ऊर्जा देतो. आज देशातील प्रत्येक क्रिकेटप्रेमीच्या मनात एकच स्वप्न आहे ते म्हणजे फायनलमध्ये भारताचा विजय. हे स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता भारतीय संघात आहे. आवश्यक आहे ती फक्त एकाग्रता, संयम आणि आत्मविश्वास टिकवून ठेवण्याची. क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे. शेवटच्या चेंडूपर्यंत काहीही घडू शकते पण एक गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे भारतीय संघ लढत राहील कारण हा संघ पराभवाला घाबरणारा नाही तर तो संघर्षातून विजय मिळवणारा संघ आहे. सेमिफायनलमध्ये इंग्लंडला पाणी पाजल्यानंतर आता फायनलमध्ये न्यूझीलंडची पाळी आहे. भारतीय खेळाडूंनी जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला, तर हा सामना देखील भारताच्या नावावर जाईल, असा विश्वास प्रत्येक भारतीयाच्या मनात आहे.

क्रिकेटचे मैदान हे केवळ खेळाचे मैदान नसते तर ते स्वप्नांचे, संघर्षाचे आणि विजयाचे रंगमंच असते. या रंगमंचावर भारतीय संघ पुन्हा एकदा इतिहास घडवण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. आता संपूर्ण देशाची नजर अंतिम सामन्याकडे लागली आहे. प्रार्थना एकच, भारतीय खेळाडूंनी आपल्या खेळातून पुन्हा एकदा देशाला अभिमानाने उभे करावे. कारण जेव्हा भारत जिंकतो, तेव्हा केवळ एक संघ जिंकत नाही; जिंकतो संपूर्ण देश, जिंकते करोडो भारतीयांची स्वप्ने आणि म्हणूनच आज प्रत्येक भारतीयाच्या ओठांवर एकच विश्वास आहे. सेमिफायनलमध्ये इंग्लंडला पाणी पाजले, आता फायनलमध्ये न्यूझीलंडची पाळी!

-प्रविण बागडे,नागपूर

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-१९ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला नगरपरिषदेचा जागतिक महिला दिन उत्साहात; पाककला व ग्रुप डान्स स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सांगोला : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सांगोला नगरपरिषदेच्या वतीने महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शनिवारी (दि. ७ मार्च २०२६) सकाळी पाककला स्पर्धा आणि दुपारी ग्रुप डान्स स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

या कार्यक्रमाला शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर हरीभाऊ गवळी, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. छाया सुर्यकांत मेटकरी तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री. आनंदा यशोदा गोरख माने व सर्व महिला नगरसेविका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

त्यानंतर बोलताना मुख्याधिकारी डॉ. गवळी यांनी सांगितले की, महिला दिनाच्या निमित्ताने नगरपरिषदेच्या माध्यमातून दरवर्षी पाककला, डान्स स्पर्धा तसेच 'होम मिनिस्टर 'सारखे उपक्रम आयोजित केले जातात. अशा कार्यक्रमांमुळे महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळते आणि महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सकाळी ११ ते १२ या वेळेत पार पडलेल्या पाककला स्पर्धेत मूग/हुलगे यापासून चविष्ट, पौष्टिक आणि रुचकर पदार्थ बनविण्याची अट ठेवण्यात आली होती. पदार्थाची चव, पौष्टिकता, सजावट, स्वच्छता आणि मांडणी या निकषांवर विजेत्यांची निवड करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धकांनी आपल्या पदार्थाचे नाव, घटक पदार्थ, कृती व पौष्टिक फायदे कागदावर लिहून सादर केले. पाककला स्पर्धेचे परीक्षण सौ. यादव मॅडम यांनी केले.

स्पर्धेसाठी महिलांनी आकर्षक आणि पौष्टिक पदार्थ सादर करून आपली पाककला कौशल्ये दाखवून दिली. यानंतर दुपारी २ वाजता ग्रुप डान्स स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत आठ महिला गटांनी सहभाग घेतला. प्रत्येक गटात सुमारे आठ ते दहा महिलांचा समावेश होता. सर्व गटांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या ग्रुप डान्स स्पर्धेसाठी पतंगे , राऊत आणि कस्तुरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आणि सामाजिक संदेश देणाऱ्या नृत्य सादरीकरणांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषदेच्या पाटील , निकम आणि कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान, ९ मार्च २०२६ रोजी 'होम मिनिस्टर' स्पर्धा आयोजित




करण्यात आली असून त्याच दिवशी पाककला, डान्स आणि होम मिनिस्टर स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## सांगोला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले प्रत्यक्ष 'बँकिंग' विश्व



सांगोला : पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी सांगोला महाविद्यालयातील मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने नुकतीच दिनांक ६ मार्च २०२६ रोजी खपर्वीश्रपव बँक सांगोला शाखेला अभ्यास भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बँकेचे प्रत्यक्ष कामकाज आणि डिजिटल क्रांतीची माहिती जाणून घेतली. शाखा व्यवस्थापक रविकिरण सुरवसे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी बँकेत खाते उघडण्यापासून ते कर्ज मंजुरीपर्यंतच्या सर्व प्रक्रियांची माहिती दिली. रोख व्यवहार, चेक क्लिअरन्स आणि लॉकर सुविधा कशा प्रकारे चालतात, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. उपशाखा व्यवस्थापक अमृत देशमुख यांनी सध्याच्या काळात सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढत असल्याने, बँकेच्या वतीने विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत मार्गदर्शन केले. मोबाईल बँकिंग वापरताना कोणती काळजी घ्यावी, यावर विशेष चर्चा करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी अर्थव्यवस्थेतील बँकेची भूमिका, व्याजाचे दर यांसारख्या तांत्रिक विषयांवर व्यवस्थापकांशी संवाद साधला. बँकिंग क्षेत्रात करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याबद्दलही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. वर्गात शिकलेले बँकिंगचे नियम प्रत्यक्षात कसे राबवले जातात, हे विद्यार्थ्यांना जवळून पाहायला मिळाले. ही भेट आमच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली असा सूर विद्यार्थ्यांमधून ऐकावयास मिळाला. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. डी. वेदपाठक, प्रा. सौ.एस.एस.भुंजे, व प्रा.पी. डी. गोडसे यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयात उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य, डॉ.सुरेश भोसले व आय. क्यू. ए. सी.प्रमुख डॉ.आर.जी.पवार यांचे सहकार्य लाभले. तसेच सर्व संस्था पदाधिकारी व सर्व संस्था सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

## सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

सोलापूर : सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दिनांक ४ मार्च २०२६ रात्री २०.०० वाजलेपासून ते दिनांक १८ मार्च २०२६ रात्री २०.०० वाजेपर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पालीस अधिनियम कलम ३७ (१) (अ ते फ) व कलम ३७ (३), अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. असे अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे होईल तसेच शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## श्री चौडेश्वरी देवांग कोष्टी महिला मंच आयोजित महिला दिनानिमित्त मिस अँड मिसेस सांगोला-२०२६' स्पर्धा जल्लोषात संपन्न

सांगोला : महिला दिनाचे औचित्य साधत श्री चौडेश्वरी देवांग कोष्टी महिला मंच, सांगोला यांच्या वतीने आयोजित 'मिस अँड मिसेस सांगोला-२०२६' ही स्पर्धा मंगळवार दि. ३ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजता अहिल्याबाई होळकर सभागृह सांगोला येथे उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमास शहरातील महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. निकिताताई देशमुख उपस्थित होत्या. परीक्षक म्हणून सौ. सायली होगाडे व कु. लौकिता लालबेग यांनी स्पर्धकांचे परीक्षण केले.

गेले तीन वर्षे हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून येथून पुढे अधिक मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम घेण्यात येईल, असे मंचाच्या अध्यक्षा यांनी यावेळी सांगितले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी रु. ५०००/- व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी रु. ३०००/-, तृतीय क्रमांकासाठी रु. २०००/- व चतुर्थ क्रमांकासाठी रु. १०००/- तसेच सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

बेस्ट वेशभूषा, बेस्ट टॅलेंट आणि बेस्ट व्यक्तिमत्व या विशेष किताबांसाठी गिफ्ट हॅम्पर व सन्मानचिन्ह देण्यात आले. लकी ड्रॉद्वारे एकूण १० आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले.स्पर्धेतील विशेष किताब विजेत्यांमध्ये बेस्ट वेशभूषा - ऐश्वर्या बनकर, बेस्ट टॅलेंट - सौ. कल्याणी सपाटे, बेस्ट व्यक्तिमत्व - पुनम सावंत यांचा समावेश आहे. थर्ड रनरअप ललिता चौधरी, सेकंड रनरअप सौ. मयुरी कांबळे, फर्स्ट रनरअप सौ. स्मिता चव्हाण तर 'मिस अँड मिसेस सांगोला२०२६' या स्पर्धेची विजेती कु. सेजल कवठेकर ठरली. कार्यक्रमासाठी सूर्योदय परिवार, श्री चांडोले, श्री घोंगडे, ट्रॅक्टर्स टीव्हीएस, श्रुती कन्स्ट्रक्शन, अर्चना स्किन केअर क्लिनिक, श्री जी ज्वेलर्स आदींनी बक्षीस दाते म्हणून सहकार्य केले. परीक्षक सौ. सायली होगाडे व कु. लौकिता लालबेग यांचेही विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमस्थळी सौ. रेशमा दिवटे व सौ. रूपाली कुरकुटे यांनी साकारलेल्या सुंदर रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळी पाहण्यासाठी महिला वर्गाने मोठी गर्दी केली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पूनम कांबळे, सौ. अश्विनी कांबळे, सौ. सविता लाटणे यांनी केले तर सौ. स्नेहा कुमठेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

डॉ. निकिताताई देशमुख यांनी आपल्या मनोगतात महिलांनी आपल्या आरोग्याची व शरीराची योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. सर्व विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करत आयोजकांचे आभार मानले. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

# विधीज्ञ कक्ष नूतन इमारत ही न्यायालय, विधीज्ञ व पक्षकार यांचेमधील दुवा म्हणून भविष्यकाळामध्ये काम करणार – मा. न्यायमूर्ती श्री. निजामोद्दीन जमादार

## सांगोला न्यायालयामध्ये विधीज्ञ कक्ष या नूतन इमारतीचे भूमिपूजन समारंभ संपन्न



सांगोला : शनिवार, दिनांक २८.०२.२०२६ रोजी दिवाणी न्यायालय, क. स्तर, सांगोला येथे विधीज्ञांकरीता नव्याने उभारण्यात येणा–या '' विधीज्ञ कक्ष '' या नूतन इमारतीचा भूमिपूजन समारंभ सोहळा मोठया उत्साहाने संपन्न झाला. हा भूमिपूजन कार्यक्रम मा. न्यायमूर्ती श्री. निजामोद्दीन जमादार साहेब, उच्च न्यायालय, मुंबई यांचे शुभहस्ते तसेच मा. न्यायमूर्ती श्री. फिरदोश पुनीवाला साहेब, उच्च न्यायालय, मुंबई व मा. श्री. मनोज एस. शर्मा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, सोलापूर तसेच ॲड मा.श्री.मिलिंद थोबडे, सदस्य, महाराष्ट्र आणि गोवा वकिल संघटना व विधीज्ञ संघ, सांगोला चे अध्यक्ष ॲड मा. श्री. एम.एन.ढाळे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या भूमिपूजन सोहळयाची सुरुवात उपस्थित मान्यवरांचे औक्षण करुन पारंपारीक पध्दतीने हलगी व तुतारीच्या निनादामध्ये करणेत आले. त्यानंतर मान्यवरांचे मुख्य व्यासपिठावर आगमन झाले. मान्यवरांचे स्वागत हे सांगोला विद्यामंदीर प्रशाला, सांगोला येथील इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या बालचमुंच्या सुंदर आवाजामध्ये स्वागतगिताने करणेत आले. त्यानंतर सर्व मान्यवर यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रास्तावीक करताना विधीज्ञ संघ, सांगोला चे अध्यक्ष ॲड मा. श्री. एम.एन. ढाळे यांनी सांगोला न्यायालयातील सध्यस्थितीचे कामकाज तसेच सांगोला तालुक्याकरीता गतिमान न्यायव्यवस्था होणेकरीता आणखी न्यायालयांची आवश्यकता असलेचे नमूद केले. या कार्यक्रमामध्ये ॲड मा.श्री. मिलिंद थोबडे, सदस्य, महाराष्ट्र आणि गोवा वकिल संघटना यांनी विधीज्ञ संघ, सांगोला यांचेमार्फत आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करणेत आला.

कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी मा.न्यायमूर्ती श्री. फिरदोश पुनीवाला साहेब, उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपले मनोगत व्यक्त करताना न्यायव्यवस्थेमध्ये पक्षकार हा केंद्रबिंदू मानून न्यायव्यवस्थेतील सर्व घटकांनी तसेच विधीज्ञ यांनी काम करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी मा.न्यायमूर्ती श्री. निजामोद्दीन जमादार साहेब, उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नव्याने उभारण्यात येणारी '' विधीज्ञ कक्ष '' ही नूतन इमारत न्यायालय, विधीज्ञ व पक्षकार यांचेमधील दुवा म्हणून भविष्यकाळामध्ये काम करणार आहे असे नमूद केले. भविष्यकालीन न्याय व्यवस्थेतील उपाययोजनांचा भाग म्हणून ही इमारत उभारण्यात येणार आहे. न्यायव्यवस्था अधिक जलद व गतिमान करणेसाठी न्यायालयाशी संबंधीत प्रत्येक घटकाने आपले योगदान देणे महत्वाचे असलेबाबत नमूद केले.

सुत्रसंचालन दिवाणी न्यायालय, सांगोलाचे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. ए. पाटील सो व विधीज्ञ संघाचे सदस्य ॲड मा. श्री. गजानन एल. भाकरे यांनी केले. या सोहळयाचे आभार प्रदर्शन सांगोला विधीज्ञ संघाचे जेष्ठ सदस्य ॲड मा. श्री उदय शि. घोंगडे यांनी केले.

या भूमिपूजन सोहळयाकरीता सोलापूर जिल्हयातील बहूतांश न्यायाधीश, सांगोला तालुका व परिसरातील सर्व विधीज्ञ, नागरिक व पक्षकार तसेच जिल्हा न्यायालय सोलापूर व सांगोला न्यायालयातील न्यायालयीन कर्मचारी यांनी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करणेकरीता दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी.आर.कुलकर्णी सो, दिवाणी न्यायालय, सांगोला, सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील सो. दिवाणी न्यायालय, सांगोला, २ रे दिवाणी न्यायाधीश श्री. एस.एस.साळुंखे सो, दिवाणी न्यायालय, सांगोला यांचे मार्गदर्शनाखाली, सांगोला न्यायालयाचे सर्व कर्मचारी व विधीज्ञ संघ, सांगोलाचे अध्यक्ष ॲड मा. श्री. एम.एन.ढाळे तसेच विधीज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी कठोर परिश्रम घेतले.

# सांगली-परळी- सांगली रेल्वेस जवळा स्थानकावर थांबा द्या : अशोक कामटे संघटना

## परळी रेल्वेस एक्सप्रेसचे डबे जोडा अन्यथा तिकीट दर कमी करा



सांगोला : रेल्वे क्रमांक ११४११ व ११४१२ परळी–सांगली डेमो एक्सप्रेस रेल्वेस जवळा स्टेशनवर थांबा मिळावा या मागणीकरीता शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांना मागणीचे निवेदन देण्यात आले आहे. सांगली मधून परळीकडे जाण्याकरीता रात्रीची शेवटची ही ट्रेन आहे सद्य परिस्थितीत प्रवाशांना एकतर जत रोड किंवा सांगोला येथे उतरून परत उलट दिशेने खाजगी वाहनाने रात्री –अपरात्री प्रवास करावा लागतो सदरच्या उलट प्रवासामुळे या परिसरातील प्रवासी त्रस्त आहेत व सर्वसामान्य लोक जे हॉस्पिटलसाठी रोज ये –जा करतात त्यांची येण्याची व जाण्याची सोय थांब्यामुळे होणार आहे.

जवळा स्टेशनला अधिकृत थांबा दिल्यानंतर मानेगाव, निजामपूर, डोंगरगाव ,सोनंद ,जवळा, बुरंगेवाडी ,भोपसेवाडी, आगलावेवाडी ,तरंगेवाडी ,हून्नूर ,भोसे, घेरडी एवढ्या सर्व मोठ्या गावातील लोकांची दररोज सोय होणार आहे. व रेल्वेचेही पर्यायाने उत्पन्न वाढणार आहे , दवाखाना आणि दैनंदिन कामासाठी रोज प्रवाशांना जाण्यासाठी हा थांबा गरजेचा आहे आणि हे गाव मोठे असल्यामुळे बाहेरच्या गावांचा संपर्क थेट असल्याने जवळा स्टेशन हे थांबा करिता योग्य आहे आणि तिथं स्टॉप देणे गरजेचे आहे.

जवळा स्टेशन वरून बाकी गावांमध्ये जाण्यासाठी वाहतूक व्यवस्था येथून आहे. सांगली वरून येताना या रेल्वेस जत रोड येथून थेट सांगोला थांबा असल्याने दरम्यानच्या गावातील नागरिकांची गैरसोय होत आहे तरी दोन्ही साईड वरून जवळा स्टेशन थांबा तात्काळ मंजूर होणे गरजेचे आहे. महत्वाचे तसेच या गाडीस एकूण ४५० किमीच्या अंतरात साधे डबे वापरण्यात आल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, एवढ्या लांब पल्ल्याच्या मोठ्या प्रवासात एलएचबी किंवा एक्सप्रेसचे कोच गरजेचे असताना तरीही रेल्वे प्रशासन प्रवाशांची सुरक्षा महत्त्वाची असताना साधे रेक (डबे) कधी बदलणार असा प्रश्न निर्माण होत आहे. अन्यथा रेल्वे प्रशासनाने या गाडीचे तिकीट दर एक्सप्रेसचे न ठेवता पॅसेंजरचे दर ठेवावेत अशी मागणी प्रवाशातून होत आहे

या मागणीची दखल न घेतल्यास रेल्वे प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन करणार असल्याचे शहीद अशोक कामटे संघटनेने सांगितले. या निवेदनाच्या प्रती खासदार धैर्यशील मोहिते –पाटील ,खासदार विशाल पाटील , विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुणे,सोलापूर, नांदेड ,अध्यक्ष प्रवासी सेवा संघ, सोलापर, महाव्यवस्थापक सो सिकंदराबाद विभाग सिकंदराबाद यांनाही देण्यात आले आहेत. यावेळी संघटनेचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

# घरपट्टी, पाणीपट्टी व गाळा भाडे वसुलीसाठी सांगोला नगरपरिषदेची विशेष मोहीम

सांगोला : सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी सांगोला नगरपरिषद हद्दीत घरपट्टी, पाणीपट्टी तसेच गाळा भाडे वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. थकीत व चालू वर्षाची फेब्रुवारी अखेर मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर व गाळे भाडे मिळून सुमारे ३ कोटी ८५ लाख ८९ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. मालमत्ताधारकांनी मार्च अखेर थकीत व चालू कराचा भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे. सांगोला शहर व उपनगरात सुमारे १६०० मालमत्ताधारक, ७ हजार नळ कनेक्शनधारक तसेच ३५० गाळेधारक व खुल्या जागाधारकांचा समावेश आहे. मालमत्ता कराच्या एकूण ६ कोटी ५३ लाख ४५ हजार रुपयांपैकी आतापर्यंत २ कोटी ८७ लाख ६८ हजार रुपये (४४ टक्के) वसूल झाले आहेत. पाणीपट्टीच्या २ कोटी ८४ लाख ८२ हजार रुपयांपैकी ९८ लाख २१ हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत. थकबाकीदारांकडून कर वसुली गतीमान करण्यासाठी मुख्याधिकारी डॉ. गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली ९ विशेष वसुली पथके स्थापन करण्यात आली आहेत.

या पथकांमध्ये कर निरीक्षक प्रियांका पाटील व रोहित गाडे, कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे, महेश राजपूत, अस्मिता निकम तसेच कर व प्रशासकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. १ मार्चपासून शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर व पाणीपट्टी भरण्यासाठी नगरपरिषद कार्यालय सुरू ठेवण्यात येणार आहे. तसेच पथकांमार्फत 'होम टू होम' भेटी देऊन घरपट्टी व पाणीपट्टीची थकबाकी वसूल करण्यात येणार आहे.

सर्व मालमत्ताधारक व गाळेधारकांनी सुजाण नागरिक म्हणून आपल्या थकीत व चालू कराचा भरणा नगरपरिषद कार्यालयात करून कटू कारवाई टाळावी, असे आवाहन कर निरीक्षक रोहित गाडे व प्रियांका पाटील यांनी केले आहे.

# सांगोला पोलीसांकडून अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई; ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

सांगोला : सांगोला तालुक्यातील वाढेगाव येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर सांगोला पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत अंदाजे ३ लाख ७ हजार रुपये किमतीचे वाहन व वाळू जप्त करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.३५ वाजण्याच्या सुमारास वाढेगाव ते जुना सावे जाणाऱ्या रस्त्यावर हजारे वस्तीसमोर पोलिसांनी तपासणी केली असता अशोक लेलँड कंपनीच्या चारचाकी वाहनातून विना परवाना विना पास शासनाची परवानगी न घेता अंदाजे एक ब्रास वाळूची अवैध वाहतूक करताना आढळून आला. या कारवाईत अंदाजे ३,०७,००० रुपये किमतीचे वाहन व सुमारे ७ हजार रुपये किमतीची वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सांगोला पोलीसांनी एकावर कारवाई केली असून पुढील तपास पोहेकॉ/२३८ सावंत करत आहेत.